Estd 1962

Naac 'A+++' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दि.८/४/२०२२

कोविड—१९ च्या प्रादुर्भावामुळे शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर २०२१ हिवाळी सत्राच्या **३६२** परीक्षांना दि. १४ फेब्रुवारी २०२२ पासून ऑनलाईन पध्दतीने सुरळीतपणे सुरवात होवून सदरच्या परीक्षा हया अंतिम टप्प्यात आलेल्या आहेत.

आज दि. ८ **एप्रिल २०२२** रोजी M.Tech., M.Sc., B.Sc. या अभ्यासक्रमाच्या एकुण **०६** विषयांच्या परीक्षा पार पडल्या. आजच्या **परीक्षेसाठी ३७** विद्यार्थ्यापैकी **३७** विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा दिली. परीक्षेस विद्यार्थ्याच्या उपस्थितीचे प्रमाण हे शेकडा १०० **टक्के** इतके होते.

आज परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांपैकी एकही विद्यार्थी परीक्षा देत असताना संशयास्पदरित्या हालचाल करताना विद्यापीठाच्या विशेष पथकास आढळून आला नाही.

आज दि.८ एप्रिल २०२२ रोजी **B.J. Sem – 1 & 2,M.B.A.(Rural Management) Sem – 1 & 2. Diploma Course in Japanese Language Sem – 2, B.Sc./M.Sc. (Nano Sc. & Tech.) Sem – 5, M.C.A. Sem - 3** अशा एकुण ७ परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले असून **आजपर्यंत एकुण** ४१९ परीक्षांचे निकाल घोषित झाले आहेत.

या परीक्षेपासून विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणा—या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रॉक्टरींग पध्दत सुरु केली आहे. यासाठी विद्यापीठाकडून विशेष पथक नेमण्यात आले आहे. सदर पथकाकडून आज कामकाज करुन प्रत्यक्ष हेडफोन वापरुन गैरप्रकार करणा—या, अन्य मोबाईल वापरुन इतरांशी दूरध्वनीवरुन बोलणारे, एकाच फ्रेममध्ये दोन विद्यार्थी दिसणारे इ. अशा विद्यार्थ्यांवर गैरप्रकार म्हणून प्रत्यक्ष नोंद करुन परीक्षा प्रमाद समितीमार्फत नियमानुसार कारवाई विद्यापीठामार्फत करण्यात येणार आहे. तसेच परीक्षेचे पाविञ्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच ऑनलाईन परीक्षा द्यावी.

तसेच सर्व विद्याशाखांच्या एम.फिल./प्रि.पीएच.डी. कोर्स वर्क परीक्षा या वर्षातून एकदा घेण्यात येत होती. तथापि सदरच्या परीक्षा हया वर्षातून दोनदा ऑफलाईन पध्दतीने घेण्याचा निर्णय नुकताच विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतला आहे. सबब ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२१ हिवाळी सत्रातील परीक्षचे आयोजन पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे —

| विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा पदव्युत्तर अधिविभागामध्ये परीक्षा अर्ज भरावयाच्या तारखा | महाविद्यालयाने अथवा पदव्युत्तर अधिविभागाने परीक्षा अर्ज ऑनलाईन (अॅप्रुव्ह) करण्याच्या तारखा | महाविद्यालयानी विद्यापीठामध्ये परीक्षा अर्जाच्या याद्या सादर करण्याच्या तारखा |
|---|---|---|
| विनाविलंब शुल्क | विनाविलंब शुल्क | विनाविलंब शुल्क |
| दि.१२/४/२०२२ | दि.१३/४/२०२२ अखेर | दि.१६/४/२०२२ |

उपरोक्त एम.फिल./प्रि.पीएच.डी. कोर्स वर्क परीक्षा हया ज्या त्या महाविद्यालयाने/अधिविभागाने आपल्यास्तरावर दि.२५ एप्रिल ते दि.१५ मे २०२२ या कालावधीत आयोजित करण्यात याव्यात, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक श्री.गजानन पळसे यांनी दिली.